संचालक, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, आयुक्त तथा अध्यक्ष व सदस्य, केंद्रीय सतर्कता आयोग व मुख्य लोकपाल व न्यायिक सदस्य लोकपाल तसेच सदस्य लोकपाल यांना राज्य अतिथींच्या यादीत अंतर्भूत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एसजीएच-२०१९/प्र.क्र.७५/३०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ जून, २०१९

प्रस्तावना :

शासन निर्णय, क्रमांक : १००२/६८८/प्र.क्र.९२/३१, दिनांक १ जानेवारी, २००४ अन्वये राज्य अतिथी नियम निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिशिष्ट-ब मध्ये नमूद असलेल्या राज्य अतिथींच्या यादीत संचालक, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, आयुक्त तथा अध्यक्ष व सदस्य, केंद्रीय सतर्कता आयोग व मुख्य लोकपाल व न्यायिक सदस्य लोकपाल तसेच सदस्य लोकपाल यांचा समावेश नाही. या तीनही यंत्रणांचे पारदर्शक कामकाज, कामकाजाचा हेतू तसेच या यंत्रणांवरील पदाधिकाऱ्यांच्या निवडीसाठी राबविण्यात येणारी कार्यपध्दती पाहता त्यांना काही प्रमाणात अतिथ्य देणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे या यंत्रणेच्या पदाधिकाऱ्यांना राज्य अतिथींच्या यादीत अंतर्भूत करुन करुन घेण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

(१) संचालक, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, आयुक्त तथा अध्यक्ष व सदस्य, केंद्रीय सतर्कता आयोग व मुख्य लोकपाल व न्यायिक सदस्य लोकपाल तसेच सदस्य लोकपाल हे कार्यालयीन कामासाठी महाराष्ट्र राज्याच्या दौऱ्यावर येत असल्यास त्या त्या वेळी त्यांना राज्य अतिथींचा दर्जा व सुविधा अनुज्ञेय राहतील असा निर्णय शासनाने घेतला आहे.

(२) उपरोक्त (१) प्रमाणे संबंधित मान्यवर कार्यालयीन दौऱ्यावर (Official Visit) असल्याबाबत त्यांचे कार्यालयामार्फत दौरा कार्यक्रम प्राप्त होणे अनिवार्य राहील.

(३) या सुविधा मान्यवरांना एका दौऱ्याच्या वेळेस कमाल ३ दिवसांपर्यंत उपलब्ध राहतील. कोणत्याही परिस्थितीमध्ये त्यामध्ये वाढ करुन देता येणार नाही. वरील निर्धारित कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी सुविधा देण्याबाबत संबंधित मान्यवरांच्या कार्यालयाकडून विनंती प्राप्त झाल्यास वाढीव कालावधीसाठी भरणा तत्वावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

(४) या मान्यवरांसोबत येणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला / खाजगी सचिवांना / स्वीय सहाय्यकांना राजशिष्टाचार विषयक सोयी-सुविधा देय राहणार नाहीत.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६१८१६३६१६३९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Satish Karbhari Jondhale

Digitally signed by Satish Karbhari Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD Protocol, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish Karbhari Jondhale
Date: 2019.06.18 16:37:04 +05'30'

(सतीश जोंधळे)
सह सचिव तथा सह मुख्य राजशिष्टाचार अधिकारी

प्रति,

१. सर्व अपर मुख्य सचिव,
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव,
३. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,
४. पोलीस आयुक्त, मुंबई,
५. सर्व प्रधान सचिव / सचिव,
६. सर्व विभागीय आयुक्त,
७. मुख्य सचिव यांचे सह सचिव,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक,
१०. सह सचिव व सह मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक,
११. निवड नस्ती.